MHGA030009492023

# <u>न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, गडचिरोली यांचे न्यायालयात</u>

(पिठासीन अधिकारी श्रीमती वासंती. आर. मालोदे)

**<u>सं. फौ. मा. कं. ५४८/२०२३</u>**

महाराष्ट्र शासन मार्फत,
पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन,
गडचिरोली, तह.जि.गडचिरोली. ... **<u>सरकार पक्ष</u>**

**<u>विरूध्द</u>**

पार्वताबाई शंकर उसेंडी,
वय ६५ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. खरपुंडी, ता. जि. गडचिरोली ... **<u>आरोपी</u>**

.......................................................................................................

## <u>नि.क्र. १ वर आदेश</u>

(आदेश पारीत दिनांक ०४/०५/२०२६)

१) मा. उच्च न्यायालय मुंबई यांचे आदेशानुसार आज विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. आरोपी याचे विरुध्द मुंबई दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५ (ई), अन्वये दोषारोप पत्र दाखल करण्यात आले. सदरील प्रकरण संमन्स प्रकरण आहे.

२) आरोपीला वेळोवेळी जमानती वारंट काढुन देखिल पोलीस यंत्रणा किंवा अभियोजन पक्ष आजपर्यत न्यायालयात हजर करण्यास असमर्थ ठरले आहे. अभियोग पक्षाने रासायनिक विश्लेषण अहवाल अभिलेखावर दाखल केलेला आहे. परंतु आरोपीच्या गैरहजेरीमध्ये सदर प्रकरणांत काहीही प्रगती होवु शकली नाही. प्रकरण हे तीन वर्षे जुने असुन विना प्रगती न्यायालयात प्रलंबित आहे. म्हणुन सदर प्रकरण पुढे चालविणे योग्य होणार नाही.

३) तरी फौजदारी प्रक्रिया संहिताचे प्रकरण २५८ प्रमाणे आरोपी विरुध्दची

कार्यवाही थांबविण्यात येत आहे. आरोपी विरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोपातुन आरोपीला दोषमुक्त करण्यात येत आहे. आरोपीच्या जामीन मुचलका व आरोपीच्या मुचलका असल्यास रद्द करण्यात येते.

४) अपील कालवधीनंतर, प्रकरणांतील जप्त मुददेमाल कायदयानुसार राज्य उत्पादन शुल्क कार्यालय गडचिरोली यांचेकडे विल्हेवाटीसाठी पाठविण्यात यावे.

५) आरोपी वरील जमानती वारंट परत घेण्यात येते. संबधित पोलीस स्टेशनला कळवावे.

VASANTI RAGHUNATH MALODE

Digitally signed by VASANTI RAGHUNATH MALODE
Date: 2026.05.04 14:26:03 +0530

दिनांक :- ०४.०५.२०२६
गडचिरोली.

(कु. व्ही.आर.मालोदे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
गडचिरोली.